**L. A. BILL No. XXXVI OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६.**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

(शा.म.मु) एचबी ५६५–१ (१०४५-६—२०२६)

**आणि, ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता; १९६२ चा महा. ३. २०२६ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ जून २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २२ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २२ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "पंचाहत्तर कोटी रुपये" या मजकुराऐवजी, "सहा हजार कोटी रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा. ३.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती. **३.** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२६ चा महा. अध्या. ७.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील, औद्योगिक क्षेत्रांत व औद्योगिक वसाहतींत उद्योगधंद्यांची पद्धतशीर स्थापना करण्यासाठी विशिष्ट तरतूद करणे, आणि सामान्यतः त्यांचे संघटन करण्यास साहाय्य देणे व त्या प्रयोजनासाठी औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करणे, आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम २२ मध्ये अशी तरतूद केली आहे की, महामंडळास, पुरेशा प्रमाणात द्रव्य साधनांची स्वतःसाठी तरतूद करण्याच्या हेतूने खुल्या बाजारातून किंवा कोणत्याही बँकांकडून किंवा वित्तीय संस्थांकडून, पैसे कर्जाऊ घेता येतील. उक्त कलम २२ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद केली होती की, महामंडळास, कोणत्याही वेळी कर्जाऊ घेता येईल अशी कमाल रक्कम, पंचाहत्तर कोटी रुपये असेल. सन १९७५ पासून, पन्नास वर्षांपेक्षा अधिक वर्षे, उक्त कर्जाची कमाल रक्कम वाढविण्यात आलेली नव्हती.

**३.** महामंडळ, राज्यातील औद्योगिक विकासासाठी औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक प्रक्षेत्रे आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा विकास हाती घेते. राज्यातील वाढत्या औद्योगिक गुंतवणुकीकरिता महामंडळास नवीन औद्योगिक प्रकल्प व पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी अतिरिक्त वित्तीय साधनसंपत्तीची आवश्यकता आहे. अशा औद्योगिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनीचे संपादन करणे देखील आवश्यक असते आणि त्यासाठी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) मधील तरतुदींनुसार जमीनमालकांना मोठ्या प्रमाणात नुकसानभरपाईची अनुषंगिक रक्कम प्रदान करणे आवश्यक ठरते.

वरील बाबी विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (२) मध्ये सुधारणा करून महामंडळास कर्ज घेता येईल त्या रकमेची कमाल मर्यादा, पंचाहत्तर कोटी रुपयांवरून सहा हजार कोटी रुपये इतकी वाढविणे इष्ट आहे, असे वाटले.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६, (२०२६ चा महा. अध्या. ७), हा प्रख्यापित केला होता.

**५.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ जून, २०२६.

**उदय सामंत,**
उद्योग मंत्री.

# सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ३६ महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

**(महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यातील उतारे)**
**(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)**

**१.** ते **२१.** *** *** ***

मंडळाचा कर्ज काढण्याचा अधिकार.

**२२.** (१) विहीत करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीनतेने महामंडळास स्वतःसाठी अर्थप्राप्तीचे पुरेसे मार्ग प्राप्त करून घेण्यासाठी हमीसहित किंवा हमीविना असलेली बंधपत्रे, ऋणपत्रे, रोखे काढून किंवा अन्यथा, खुल्या बाजारातून, कर्ज घेता येईल, किंवा कोणत्याही अनुसूचित बँकांकडून किंवा त्याबाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी मान्यता देईल अशा इतर बँकांकडून किंवा वित्तीय परिसंस्थांकडून कर्ज घेता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये महामंडळास कोणत्याही वेळी कर्जाऊ घेता येईल अशी कमाल रक्कम पंचाहत्तर कोटी रुपये असेल. मात्र राज्य शासनास, राज्य विधानसभेची मान्यता घेऊन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या प्रयोजनासाठी यापेक्षा जास्त कमाल रक्कम निश्चित करता येईल.

**२३.** ते **६९.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६.]**

**[महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[डॉ. उदय सामंत,**
उद्योग मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.